॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

# परिपत्रक क्रमांक १४९/२०२०

## (अत्यंत महत्वाचे)

संदर्भः- १) मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील पत्र जा.क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र. ६०/२०/तांशि-१, दि. १९ मार्च, २०२०.

२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. समय/२०२०/प्र.क्र.३५/१८ (र. व. का.) दि. १८ मार्च, २०२०.

३) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक १४५/२०२० (जा. क्र. कबचौउमवि/२/कोरोना(कोव्हीड-१९)/१५८/२०२०, दि. १९.०३.२०२०.

४) D.O. No. Secy (HE)/MHRD/2020 New Delhi dtd. 21 March, 2020.

५) विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र जा.क्र. F.No. 1-14/2020(Website), dtd. 21.03.2020.

६) डॉ. मोहन खताळ, सहसंचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र जा.क्र.उशिसं/कोरोना/मवि-१/२०२०/३८१९/४०४२, दि. २३.०३.२०२०.

७) विद्यापीठ परिपत्रक क्र. १४७/२०२० जा. क्र. कबचौउमवि/२/कोरोना(कोव्हीड-१९)/१६१/२०२०, दि. २३.०३.२०२०.

८) गृह विभाग, भारत सरकार यांचे पत्र क्र. ४०-३/२०२०/DM-I (A), दि. २४.०३.२०२०.

९) महसूल, वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि. २५.०३.२०२०.

उपरोक्त संदर्भांकित पत्र क्र. ४, ५ व ६ अन्वये प्राप्त निर्देशास अनुसरून दि. २३ मार्च, २०२० ते दि. ३१ मार्च, २०२० चे दरम्यान महाविद्यालयातील शिक्षक/संशोधक/अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी घरी राहून (Work from Home) संबंधित विभागाचे कामकाज करण्याबाबत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य/मान्यताप्राप्त परिसस्थांचे मा. संचालक यांना संदर्भ क्र. ७ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते.

याबाबत संदर्भ क्र. ८ व ९ अन्वये अनुक्रमे गृह विभाग, भारत सरकार व महाराष्ट्र शासनाकडून नव्याने प्राप्त आदेश तथा सूचनेनुसार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. संचालक यांना सुचित करण्यात येते की, महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये काम करणारे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना कोरोना विषाणूचा (कोव्हीड-२०१९) संसर्ग होऊ नये व त्याचा प्रादुर्भाव/प्रसार वाढू नये याकरीता प्रतिबंधात्मक व तातडीची उपाययोजना म्हणून **मंगळवार दि. १४.०४.२०२० पर्यंत** सर्व शिक्षक, अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी घरी बसूनच आवश्यक ती शैक्षणिक/प्रशासकीय कामे करावीत.

तसेच कार्यालयीन कामकाजाकरीता महाविद्यालय/परिसंस्थेच्या कार्यालयास एखाद्या शिक्षक, अधिकारी, कर्मचारी यांची गरज भासल्यास प्राचार्य/संचालक/विभागप्रमुखांच्या आदेशानुसार संबंधित शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांना कार्यालयामध्ये उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

...२...

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत, दुरध्वनी क्र : ०२५७ - २२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७ - २२५८४०३,४०६
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257 - 2258428, 2258429
Fax No. 0257 - 2258403, 406 Email : registrar@nmu.ac.in Web : www.nmu.ac.in

उपरोक्त बाबी लक्षात घेता, **महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या परिसरात कोणत्याही कारणास्तव जमाव/मेळाव्याच्या स्वरूपात जनसमुदाय एकत्रित येणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्या अनुषंगाने कोणतेही कार्यक्रम उदा. चर्चासत्रे, परिसंवाद, सांस्कृतिक, जनजागृती कार्यक्रम, विविध बैठका, उजळणी वर्ग इ. कार्यक्रमांचे आयोजन पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत करु नये.**

तसेच संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचेकडील पत्र जा.क्र. कबचौउमवि/७अ/ कोरोना/ परीक्षा स्थगिती/कु.१५०/२०२०, दि. १६ मार्च, २०२० अन्वये दि. १७ मार्च, २०२० ते दि. ३१ मार्च, २०२० पर्यंत आयोजित केलेल्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्याबाबत व या कालावधीतील परीक्षांचे सुधारित वेळापत्रकाबाबत शासनाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल असे कळविण्यात आले होते. या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठाद्वारा आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा (लेखी व प्रात्यक्षिक) ह्या दि.१४ एप्रिल,२०२० पर्यंत स्थगित करण्यात येत असून, सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या आयोजनाबाबत शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार वेळोवेळी आढावा घेऊन, त्या अनुषंगिक सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. संचालक यांना कळविण्यात येते की, उद्भवलेल्या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेवून संबंधित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे सर्व कामकाज घरी राहून Work from Home च्या माध्यमातूनच होईल या संदर्भात त्यांनी महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाशी चर्चा करुन आवश्यक कार्यवाही करावी.

सदरचे निर्देश हे दि. १४.०४.२०२० पर्यंत लागू राहतील.

आदेशावरून,

(प्रा. भा. व्यं. पवार)
**प्र. कुलसचिव**

जा.क्र.कबचौउमवि/२/कोरोना(कोव्हीड-१९)/१२४/२०२०
दि. २८.०३.२०२०

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे
मा. प्राचार्य/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.

**प्रत माहितीसाठी.**

१. मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.
२. मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.
३. मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
५. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव.